**नेपाळ मधील वर्तमान घडामोडींवर प्रसिद्ध पत्रक (09 सप्टेंबर 2025)**

09 सप्टेंबर 2025

आम्ही कालपासून नेपाळ मधील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेऊन आहोत. युवकांच्या जीवित हानी विषयी तीव्र दु:ख आहे. आमच्या भावना आणि प्रार्थना मृतांच्या कुटुंबियांसोबत आहे. जखमींना लवकरात लवकर बरे वाटावे यासाठी प्रार्थना करतो.

2. निकटचा मित्र आणि शेजारी म्हणून, आम्हाला आशा आहे की सर्व संबंधित संयम राखतील आणि शांततापूर्ण उपाय आणि संवाद मार्गाने कोणत्याही समस्यांचे निराकरण करतील.

3. काठमांडू आणि नेपाळच्या इतर अनेक शहरांमध्ये प्रशासनाने कर्फ्यू लागू केल्याची नोंद आम्ही घेतली आहे. नेपाळमधील भारतीय नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचा आणि नेपाळ प्रशासनाच्या वतीने जारी सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचा सल्ला दिला जातो.

**नवी दिल्ली**

09 सप्टेंबर 2025